**नियमित फौजदारी खटला क्र. ३०१९४६/२०१५**

**शेख निजाम शेख हसन वि. शेख करीम शेख पटेल व इतर**

**निशाणी – २०९**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६**

नाव – शेख शकील शेख निजाम,

वय – ३० वर्ष, व्यवसाय – शेती,

राहणार – गट नं. ३०, देवळाई, औरंगाबाद.

**शपथेवर सरतपास फिर्यादी पक्षातर्फे विधिज्ञ श्री. व्ही.के. जाधव यांचे मार्फत सुरू –**

१. आरोपी क्र. १ ते १३ यांना मी ओळखतो. घटना ही दि. २५.०८.२०१५ रोजी गट क्र. ३०, देवळाई येथे आमचे घरी घडलेली आहे. त्यावेळी आरोपी क्र. १ ते १३ हे आमचे घरी तीन चारचाकी गाडयांमध्ये आले. त्या गाडयांचा क्र. एम.एच.–२१–५५५५, एम.एच.–२०–५३११, एम.एच.–२०–२७७७ असे होते. त्यापैकी चार आरोपी यांनी आमचे घराचा दरवाजा तोडला. त्यावेळी आरोपी क्र. १ याच्या हातामध्ये लोखंडी सळई होती. तसेच इतर आरोपी यांचे हातामध्ये लोखंडी सळई, हॉकी स्टीक होते. त्यानंतर आरोपी यांनी आमचे घरातील महिला व मुलांना मारहाण केली. त्यानंतर त्यांनी आमचे घरातील जीवनावश्यक वस्तुंची नासधुस केली. तसेच घराच्या काचा फोडल्या. आरोपी यांनी माझी आई शेख नजमा हिची सोन्याची पोत हिसकावुन घेतली. तसेच माझ्या वहिनीचे नेकलेस हिसकावुन घेतला. त्यानंतर आरोपी यांनी घरातील सर्व लोकांना मारहाण केली. तसेच आरोपी यांनी आमच्या घरासमोर कब्जा केला. आरोपी यांनी आम्हाला भडव्या, मादरचोद अश्या शिव्या दिल्या. आरोपी क्र. १ व त्याचे वडील हे आम्हाला जमीनीतुन हाकलुन देण्याची भाषा करीत होते व आम्हाला धमकी देत होते. त्यावेळी तेथे रफीक लतीफ खॉं व शेख अलीम शेख दादा तेथे आले व त्यांनी भांडण सोडवले. तसेच आम्हाला जमीनीतुन हाकलुन देऊ व गाडीने उडवुन देऊ अशी धमकी देत होते. आरोपी क्र. १ हा सरपंच असुन सर्व आरोपी हे गुंड प्रवृत्तीचे आहेत. त्यांना राजकीय पाठबळ आहे. आरोपी हे नेहमी आम्हाला त्रास देत असतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी आमची तक्रार घेतली नाही. त्यानंतर आम्ही आर.पी.ए.डी. द्वारे लेखी तक्रार पोलीसांना पाठवली. त्यानंतर देखील पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. तरी आरोपींचे विरुद्ध योग्य ते शासन व्हावे. आरोपी यांना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी क्र. १, ३, ४, ६ ते ९ हे आजरोजी न्यायालयात हजर आहेत. (आरोपी क्र. २, ५, १० ते १३ यांचे गैरहजेरी माफीचा अर्ज आरोपीच्या विधिज्ञांनी दाखल केला आहे.)

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ५, ७, ९ ते १३ यांचेतर्फे विधिज्ञ श्री. ए.के. ठाकरे यांचे मार्फत सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचेमध्ये दिवाणी न्यायालयात वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमचेमध्ये त्या दिवाणी दाव्यामध्ये बऱ्याचवेळा तडजोडीची बोलणी झाली. दिवाणी न्यायालयामध्ये माझ्या विरुद्ध आदेश झाले किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी न्यायालयामध्ये आरोपी यांनी आमचे म्हणणे ऐकावे याकरीता मी व माझ्या वडीलांनी खोटी केस दाखल केली.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी आर.पी.ए.डी. ने पोलीस ठाण्यात तक्रार पाठवल्यानंतर पोलीस अधिकारी श्रीमती थोरात यांनी माझा जबाब नोंदवुन घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी सरतपासात जे कथन केले ते श्रीमती थोरात यांचे समक्ष जबाबामध्ये सांगितले नाही. मी प्रस्तुत कामी पडताळणीचे वेळी साक्ष दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घरच्यांच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी माझे वडील व भाऊ यांची साक्ष प्रस्तुत कामी झालेली आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे वेगवेगळया ठिकाणी राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याने माझ्या वडीलांच्या विरुद्ध चोरीची केस दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही.

**उलटतपास आरोपी क्र. ६ व ८ तर्फे विधिज्ञ श्री. ए.एम. केकान यांचे मार्फत सुरु –**

५. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी न्यायालयात येण्यापुर्वी न्यायालयात काय साक्ष दयायची याबाबत माझ्यामध्ये व माझ्या वडीलांमध्ये व भावामध्ये चर्चा झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही.

(आरोपी क्र. १ ते ५, ७, ९ ते १३ यांचेतर्फे विधिज्ञ यांनी घेतलेला उलटतपास ॲडॉप्ट केला.)

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती.**

Digitally signed by GUNARI SAMEER GOPAL
Date: 2025.03.06 17:41:54 +0530

**दिनांक –०६.०३.२०२५** **(समीर गोपाळ गुणारी)**

**ठिकाणी – औरंगाबाद** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**(न्यायालय क्र.१९), औरंगाबाद**